# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/०१/२०२५ (रविवार) सायंकाळ**

---

## पोस्टे काटोल हद्दीतील मौजा डोंगरगाव
## येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या ०४ इसमांवर कायदेशिर कार्यवाही

दि. १८/०१/२०२५ रोजी पोस्टे काटोल येथील स्टाफ पोस्टे हद्दीत प्रोव्हीशन रेडकामी पेट्रोलींग करीत असता मिळालेल्या गोपनीय माहिती नुसार पो.स्टे. काटोल हद्दीत मौजा डोंगरगाव परिसरात अवैधरित्या गावठी पद्धतीने भट्टी लावून मोहाफूल गावठी दारू गाळणारे इसमांवर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु गाळणारे **आरोपी नामे— दिनेश तेजा मारवाडी, वय २१ वर्ष रा. डोंगरगाव ता. काटोल व ०३ महिला आरोपी** हे मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढताना मिळुन आले. आरोपीचे ताब्यातून प्लास्टीक डबकीमध्ये एकुण १६० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती १६००० रू., मोहाफुल सडवा एकुण १४०० लिटर किमती ४९००० रू. प्लास्टीक ड्रम व इतर साहित्य किंमती ३५०० रू असा एकुण ६८५०० रू चा मुदेमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. ०४ आरोपीतांविरुद्ध पो.स्टे काटोल येथे कलम ६५ (ई) (एफ) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर